पुढारी

# मराठी भाषा घडविण्यात संत तुकारामांचे योगदान मोलाचे

## डॉ. सदानंद मोरे; 'तुकारामबावांच्या गाथेचे निरुपण' ग्रंथाचे प्रकाशन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मराठी भाषा घडविण्यामध्ये संत तुकाराम यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्यामुळे मराठी भाषेचे सौंदर्य महाराष्ट्राच्या घराघरांत व मनामनांत वास करते आहे, असे प्रतिपादन संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनातर्फे 'तुकारामबावांच्या गाथेचे निरुपण' या द्विखंडात्मक ग्रंथ प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. डॉ. मोरे म्हणाले, संत तुकाराम महाराजांच्या अभंगांमधील भाषेचे सौंदर्य अमर्याद आहे. त्यांनी मराठी भाषेला कितीतरी नवनवीन शब्दांची देणगी दिली आहे. विद्यापीठांनी स्थानिक परंपरा, कला, संस्कृती जोपासना व संवर्धनासाठी योगदान देणे ही महत्त्वाचे आहे, पण त्यासाठी अध्यासनांना लोकाश्रय मिळणे गरजेचे आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'तुकारामबावांच्या गाथेचे निरुपण' ग्रंथ प्रकाशनप्रसंगी ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे. डॉ. राजन गवस, मारुती जाधव-तळाशीकर, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी.टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे आदी.**

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ज्ञानदेवांनी मराठी भाषेच्या विस्ताराचा व्यापक स्वरूपाचा पाया रचला हे खरे, तितकेच तुकारामांनी या भाषेला अधिक बहुप्रसवी बनविताना सहजसोपेपणाचे, बोली भाषेचे, संवादाच्या प्रवाहीपणाचे आयामही दिले. जीवन जगण्याच्या तत्त्वज्ञानाची शिदोरी तुकारामांनी अभंगांमधून खुली केली आहे.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, भक्तीमार्ग व संत परंपरेत तुकारामांचे कार्य पथदर्शक स्वरूपाचे आहे. मारुती जाधव गुरुजी म्हणाले, संत तुकाराम अध्यासनाच्या रूपाने विद्यापीठाने तुकारामांचे एक लोकाभिमुख प्रभावी स्मारक उभे केले आहे. त्यातही एखाद्या संताच्या अभंगांचा ग्रंथ प्रकाशित करणारे हे एकमेव विद्यापीठ आहे. डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत केले. प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

प्रकाशन सोहळ्यासाठी वारकरी संप्रदायातील नागरिकांची रीघ विद्यापीठात लागली होती. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहाने वारकऱ्यांची अभूतपूर्व गर्दी पाहिली. सभागृहाबाहेरील लॉन परिसरात एलईडी स्क्रीन उभारून कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणाची व्यवस्था केली होती.

'तुकारामबावांच्या गाथेचे निरुपण' हा द्विखंडात्मक ग्रंथ सुमारे १८०० हून अधिक पृष्ठांचा आहे. त्यांची किंमत तीन हजारांहून अधिक आहे. सर्वसामान्य वाचकांना डोळ्यासमोर ठेवून विद्यापीठाने ८७० रुपये सवलतीच्या दरात हा ग्रंथ विक्रीसाठी उपलब्ध केला. त्यामुळे उपस्थितांचा त्याच्या खरेदीलाही मोठा प्रतिसाद लाभला.

### संत तुकाराम व कोल्हापूर यांचा जवळचा संबंध

भावकीमध्ये काही कारणाने वाद होऊन बहिणाबाई यांच्या कुटुंबीयांनी गाव सोडले. ते काही काळ कोल्हापुरात होते. त्यावेळी येथे सातार्‍याचे जयरामस्वामी वडगावकर हे कीर्तनात तुकारामांचे अभंग सादर करीत. बहिणाबाईंना त्या अभंगांचे वेड लागले. त्यांनी तुकारामांना गुरू करायचे ठरविले. त्यांना पुढे तुकारामांचा गुरुपदेश व सहवास लाभला. त्या संत बहिणाबाई झाल्या. कोल्हापूरमध्ये तुकारामांचे अभंग बहिणाबाईंच्या कानी पडले नसते तर इतिहास होऊ शकला नसता. त्यामुळे तुकारामांच्या एक महत्त्वाच्या शिष्या कोल्हापूरमध्ये घडल्या, हे लक्षात घ्यावे लागेल, असे डॉ. मोरे म्हणाले.

लोकमत

# संत बहिणाबाई या कोल्हापूरमध्येच घडल्या

## सदानंद मोरे : शिवाजी विद्यापीठात 'तुकारामबावांच्या गाथेचे निरुपण' ग्रंथाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** संत तुकाराम यांचे अभंग कोल्हापूरमध्ये त्या काळी बहिणाबाईच्या कानी आले नसते, तर पुढे त्यांच्याबाबतचा इतिहास होऊ शकला नसता. त्यामुळे तुकारामांच्या एक महत्त्वाच्या शिष्या कोल्हापूरमध्ये घडल्या, हे लक्षात घ्यावे लागेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनातर्फे आयोजित 'तुकारामबावांच्या गाथेचे निरुपण' या द्विखंडात्मक ग्रंथाच्या प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, तर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, साहित्यिक प्रा. राजन गवस, गाथेचे 'निरुपण'कार मारुती जाधव प्रमुख उपस्थित होते.

आदित्य वेल्हाळ



शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी 'तुकारामबावांच्या गाथेचे निरुपण' या ग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डावीकडून राजन गवस, मारुती जाधव-तळाशीकर गुरुजी, देवानंद शिंदे, डी. टी. शिर्के, विलास नांदवडेकर, रणधीर शिंदे, नंदकुमार मोरे उपस्थित होते.

यांच्या कुटुंबीयांनी काही कारणाने सिऊर (औरंगाबाद) येथील त्यांचे घर सोडले. फिरत-फिरत ते कोल्हापूरमध्ये आले. काही वर्षे ते येथे होते. त्यावेळी येथे साताऱ्याच्या जयरामस्वामी वडगावकर यांची कीर्तने सुरु होती. ते आपल्या कीर्तनांत तुकारामांचे अभंग सादर करीत. बहिणाबाईंना जणू त्या अभंगांचे वेड लागले. त्यांनी तुकारामांना गुरु करायचे ठरविले.

पोहोचल्या. तेथे त्यांना तुकारामांचा गुरुपदेश, सहवास लाभला. त्यापुढे संत बहिणाबाई झाल्या. त्यामुळे तुकारामांच्या एक महत्त्वाच्या शिष्या कोल्हापूरमध्ये घडल्या.

डॉ. शिंदे म्हणाले, संत तुकाराम यांनी जीवन जगण्याच्या तत्त्वज्ञानाची शिदोरी आपल्या अभंगांमधून खुली केली. हे ज्ञान माणसाचे जगणे सहजसोपे आणि नितांतसुंदर

मारुती जाधव म्हणाले, एखाद्या संताच्या अभंगांचा ग्रंथ प्रकाशित करणारे शिवाजी विद्यापीठ हे एकमेव विद्यापीठ आहे. ही गाथा प्रकाशित करुन विद्यापीठाने माझा व्यक्तिगत सन्मान तर वाढविलाच; पण वारकरी समाजासाठीही भरीव योगदान दिले आहे.

या कार्यक्रमात अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी

### मराठी भाषेला शब्दांची देणगी

- संत तुकाराम महाराज यांनी मराठी भाषेला कितीतरी नवनवीन शब्दांची देणगी दिली. ही भाषा समृद्ध करण्यामध्ये त्यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांचे अभंग आशयात्मकदृष्ट्या गहन आहेत.
- मारुती जाधव (तळाशीकर) गुरुजी यांनी आशयसूत्रे लक्षात घेऊन या अभंगांचे अत्यंत चिकित्सकपणे, सर्वसामान्यांना डोळ्यांसमोर ठेवून वर्गीकरण केले. हे 'तुकारामबावांच्या गाथेचे निरुपण' ग्रंथाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे, असे डॉ. मोरे यांनी सांगितले.

प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास

# मराठी भाषेत तुकाराम महाराजांचे योगदान

## डॉ. सदानंद मोरे; शिवाजी विद्यापीठात 'तुकारामबावांच्या गाथेचे निरूपण' ग्रंथाचे प्रकाशन

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २९ : ''मराठी भाषा घडविण्यात संत तुकारामांचे मोलाचे योगदान आहे. तुकारामांमुळेच मराठी भाषेचे सौंदर्य घरांत, मनांत वास करत आहे,'' असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांनी केले.**

शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनातर्फे 'तुकारामबावांच्या गाथेचे निरूपण' या द्विखंडात्मक ग्रंथाचे प्रकाशन डॉ. मोरे यांच्या हस्ते झाले. राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रा. राजन गवस, गाथेचे निरूपणकार मारुती जाधव-तळाशीकर (गुरुजी), मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे उपस्थित होते.

डॉ. मोरे म्हणाले, ''संत तुकाराम महाराजांनी कितीतरी नवीन शब्दांची देणगी दिली. मराठी भाषेत वेदान्ताचा अर्थ सर्वप्रथम तुकारामांनीच सांगितला. संत बहिणाबाईंनी त्यांच्या अभंगांना 'तुकाराम वेद' असे नाव दिले. तुकारामांचे अभंग वारकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी न्यायमूर्ती रानडे, प्रा. भांडारकर यांच्यापासून अनेकांनी प्रयत्न केले. त्यांच्या पंक्तीत तळाशीकर गुरुजी जाऊन बसले आहेत.''

डॉ. मोरे म्हणाले, ''संत तुकाराम अन् कोल्हापूरचा जवळचा संबंध आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'तुकारामबावांच्या गाथेचे निरूपण' ग्रंथाचे प्रकाशन डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते झाले. डावीकडून डॉ. राजन गवस, डॉ. मोरे, मारुती जाधव-तळाशीकर, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे.

औरंगाबादजवळील शिऊर गावामध्ये बहिणाबाई नावाची मुलगी जन्मली. भावकीमध्ये वाद होऊन तिच्या कुटुंबीयांनी घर, गाव सोडले. फिरत ते कोल्हापुरी दाखल झाले. त्यावेळी येथे साताऱ्याच्या जयरामस्वामी वडगावकर यांची कीर्तने सुरू होती. बहिणाबाईंना जणू त्या अभंगांचे वेड लागले. त्यांनी तुकारामांना गुरू करायचे ठरविले. अखेरीस देहू येथे तुकारामांच्या दर्शनाला पोहोचल्या. त्या पुढे संत बहिणाबाई झाल्या.''

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, ''ज्ञानदेवांनी मराठी भाषेच्या विस्ताराचा व्यापक स्वरूपाचा पाया रचला, हे जितके खरे; तितकेच तुकारामांनी या भाषेला अधिक बहुप्रसवी बनविताना सहजसोपेपणाचे, बोली भाषेचे, संवादाच्या प्रवाहीपणाचे आयामही दिले. त्यांच्या साडेचार हजारांहून अधिक असणाऱ्या गाथेतील आशयसूत्रे, विषयसूत्रांचा साकल्याने विचार केला असता दिसून येते, की मानवी जीवनाला स्पर्श करणाऱ्या प्रत्येक विषयाला तुकारामांनी आपला परीसस्पर्श केला.''

मारुती जाधव गुरुजी म्हणाले, ''संत तुकाराम अध्यासनाच्या रूपाने विद्यापीठाने तुकारामांचे एक लोकाभिमुख प्रभावी स्मारक उभे केले आहे. त्यातही एखाद्या संताच्या अभंगांचा ग्रंथ प्रकाशित करणारेही हे एकमेव विद्यापीठ आहे. ही गाथा प्रकाशित करून विद्यापीठाने माझा सन्मान तर वाढविलाच, पण वारकरी समाजासाठीही भरीव योगदान दिले.''

डॉ. शिर्के यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. मोरे यांनी स्वागत तर प्रा. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नांदवडेकर यांनी आभार मानले.

### ग्रंथ खरेदीला प्रतिसाद

'तुकारामबावांच्या गाथेचे निरूपण' ग्रंथ सुमारे १८०० हून अधिक पृष्ठांचा आहे. बाजारभावानुसार त्याची किंमत तीन हजारांहून अधिक होते. तथापि, सर्वसामान्य वाचकांना डोळ्यासमोर ठेवून विद्यापीठाने ८७० रुपये सवलतीच्या दरात ग्रंथ विक्रीसाठी उपलब्ध केला.

पुढारी

# रोहटक विद्यापीठाचा कुलगुरू चषकावर कब्जा

## पंजाबी विद्यापीठ पटियाला उपविजेते; सामनावीर दीपक कुंभार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठच्या मैदानावर शुक्रवारी झालेल्या अंतिम सामन्यात महर्षी दयानंद विद्यापीठ रोहटक संघाने पंजाबी विद्यापीठ पटियाला संघाचा पराभव करून रोहटक विद्यापीठाने 'कुलगुरू चषक' टी-२० वर कब्जा घेतला. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचारी संघाच्या वतीने या स्पर्धेचे संयोजन केले आहे. सामनावीरचा बहुमान रोहटक संघाचा खेळाडू दीपक कुंभार याने पटकाविला.

नाणफेक जिंकून रोहटक विद्यापीठाने प्रथम फलंदाजी केली. २० षटकांत संघाने ६ बाद १४१ धावा केल्या. संघाच्या नरेंद्र कुमार ४२, गौरव ४९, दीपक कुंभार १५, राजेश शर्मा १० अशा धावा काढल्या. तर राजेश शर्मा १०, ऋषी ७, पंकज नैनी ०१ धावा केल्या. पंजाबी विद्यापीठाने अवांतर ८ धावा दिल्या. गोलंदाजी करताना पंजाबी संघाकडून जशबीर सिंघने १३ धावात २ तर प्रितिपल सिंगने ४ षटकात ३० धावा देत २ गडी बाद केले.






कोल्हापूर : अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचारी 'कुलगुरू चषक' टी-२० क्रिकेट स्पर्धेतील विजेता महर्षी दयानंद विद्यापीठ रोहटकचा संघ. दसऱ्या छायाचित्रात उपविजेता ठरलेला पंजाबी विद्यापीठ पटियालाचा संघ. (छाया : पप्पू अत्तार)

महर्षी दयानंद विद्यापीठ रोहटक संघाने केलेल्या १४१ धावांचा पाठलाग करण्यात पंजाबी संघ अपयशी ठरला. संघाने १९.२ षटकांत १० बाद १२२ धावा करून संघ तंबूत परतला. फलंदाजी करताना संघाच्या हरपित सिंग १९, परमिंदर सिंग १७, दीपक सिंग २४, जशबिर सिंग २९ धावा करत तुफानी खेळी केली. मात्र रोहटक संघाच्या गोलंदाजीपुढे ते अपयशी ठरले. रोहटकच्या पंकज नैपी २, ऋषी २, राज कुंभार २, दीपक कुंभार ३ तर नरेंद्र कुंभार याने १ बळी घेतला. संघाने ११ अवांतर धावा दिल्या. १९ धावांनी महर्षी दयानंद विद्यापीठ रोहटक संघाने पंजाबी विद्यापीठ पटियाला संघावर मात करून स्पर्धेचे विजेतपद पटकाविले.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'तुकारामबावांच्या गाथेचे निरुपण' या ग्रंथाचे प्रकाशन शुक्रवारी ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी डॉ. राजन गवस, डॉ. सदानंद मोरे, निरुपणकार मारुती जाधव-तळाशीकर, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.**

# मराठी भाषा घडवण्यात तुकोबांचे योगदान मोलाचे : डॉ. सदानंद मोरे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

मराठी भाषा घडवण्यामध्ये संत तुकाराम यांचे मोलाचे योगदान आहे. तुकारामांमुळेच मराठी भाषेचे सौंदर्य महाराष्ट्राच्या घराघरात आणि मनामनात वास करते आहे, असे प्रतिपादन संत साहित्याचे गाढे अभ्यासक व ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनातर्फे करण्यात येत असलेल्या 'तुकारामबावांच्या गाथेचे निरुपण' या द्विखंडात्मक ग्रंथाचे प्रकाशन विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात शुक्रवारी डॉ. मोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. मोरे म्हणाले, संत तुकाराम महाराजांच्या अभंगांमधील भाषेचे सौंदर्य अमर्याद आहे. त्यांनी मराठी भाषेला कितीतरी नवनवीन शब्दांची देणगी दिलेली आहे. मराठी भाषा समृद्ध करण्यामध्ये त्यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांची भाषा इतकी सामर्थ्यशाली आहे की, तुकाराम गाथेचा समावेश मराठी भाषेच्या बीजग्रंथांमध्ये करण्यात आलेला आहे. मराठी भाषेत वेदांताचा अर्थ सर्वप्रथम तुकारामांनीच सांगितला. हे अभंग एकीकडे समजायला जितके सोपे, तितकेच आशयात्मकदृष्ट्या गहनही आहेत. संत बहिणाबाईंनी त्यांच्या अभंगांना 'तुकाराम वेद' असे नाव दिले, इतकी ताकद त्या अभंगांमध्ये आहे.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, ज्ञानदेवांनी मराठी भाषेच्या विस्ताराचा अत्यंत व्यापक स्वरूपाचा पाया रचला हे जितके खरे, तितकेच तुकारामांनी या भाषेला अधिक बहुप्रसवी बनवताना सहजसोपेपणाचे, बोलीभाषेचे, संवादाच्या प्रवाहीपणाचे आयामही दिले. त्यांच्या साडेचार हजारांहून अधिक असणाऱ्या या गाथेमधील आशयसूत्रे आणि विषयसूत्रांचा साकल्याने विचार, अभ्यास केला असता असे दिसून येते.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, भक्तिमार्ग आणि संत परंपरेत तुकारामांचे कार्य पथदर्शक स्वरूपाचे आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने या गाथेचे प्रकाशन करणे हा आनंदाचा व अभिमानाचा क्षण आहे.

मारुती जाधव म्हणाले, संत तुकाराम अध्यासनाच्या रूपाने शिवाजी विद्यापीठाने तुकारामांचे एक लोकाभिमुख प्रभावी स्मारक उभे केले आहे. त्यातही एखाद्या संताच्या अभंगांचा ग्रंथ प्रकाशित करणारेही हे एकमेव विद्यापीठ आहे. डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत, तर प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 NOV 2019
तरूण भारत

# मराठी भाषेत संत तुकारामांचे योगदान

## ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांचे प्रतिपादन : 'तुकारामबावांच्या गाथेचे निरुपण' ग्रंथाचे प्रकाशन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

संत तुकाराम महाराजांच्या अभंगांमधील भाषेचे सौंदर्य अमर्याद आहे. त्यांनी मराठी भाषेला कितीतरी नवनवीन शब्दांची देणगी दिलेली आहे. मराठी भाषा समृद्ध करण्यामध्ये त्यांचे मोलाचे योगदान आहे. तुकारामांमुळेच मराठी भाषेचे सौंदर्य महाराष्ट्राच्या घराघरांत आणि मनामनांत वास करते आहे, असे प्रतिपादन संत साहित्याचे गाढे अभ्यासक व ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील संत तुकाराम अध्यासनाच्या वतीने आयोजित 'तुकारामबावांच्या गाथेचे निरुपण' या द्विखंडात्मक ग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.



डॉ. मोरे म्हणाले, तुकाराम गाथेचा समावेश मराठी भाषेच्या बीजग्रंथांमध्ये करण्यात आला आहे. मराठी भाषेत वेदांताचा अर्थ सर्वप्रथम तुकारामांनीच सांगितला. हे अभंग एकीकडे समजायला जितके सोपे, तितकेच आशयात्मकदृष्ट्या गहनही आहेत. कोल्हापुरात तुकारामांचे अभंग बहिणाबाईंच्या कानी आले नसते, तर हा इतिहास होऊ शकला नसता. त्यामुळे तुकारामांच्या एक महत्त्वाच्या शिष्या कोल्हापूरमध्ये घडल्या, हा इतिहास आहे.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, तुकारामांनी मराठी भाषेला अधिक बहुप्रसवी बनविताना सहजसोपेपणाचे, बोली भाषेचे, संवादाच्या प्रवाहीपणाचे आयामही दिले. त्यांच्या साडेचार हजारांहून अधिक गाथेमधून जीवन जगण्याच्या तत्त्वज्ञानाची शिदोरी मिळते. मारुती जाधव गुरूजी म्हणाले, संत तुकाराम अध्यासनाच्या रुपाने शिवाजी विद्यापीठाने तुकारामांचे एक लोकाभिमुख प्रभावी स्मारक उभे केले आहे. त्यातही एखाद्या संताच्या अभंगांचा ग्रंथ प्रकाशित करणारे हे एकमेव विद्यापीठ आहे. ही गाथा प्रकाशित करून विद्यापीठाने माझा व्यक्तीगत सन्मान तर वाढविलाच, पण वारकरी संप्रदायासाठी भरीव योगदान दिले आहे.

डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत केले. प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रा. राजन गवस, गाथेचे निरुपणकार मारुती भाऊसाहेब जाधव तथा तळाशीकर गुरूजी, मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे उपस्थित होते.

### वारकऱ्यांची उपस्थिती लक्षणीय

या प्रकाशन सोहळ्यासाठी वारकरी संप्रदायातील नागरिकांची मोठी उपस्थिती होती. त्यामुळे हा प्रकाशन सोहळा पाहण्यासाठी सभागृहाबाहेरच्या लॉन परिसरात एलईडी स्क्रीनवर थेट प्रक्षेपणाची व्यवस्था केली होती. तसेच'तुकारामबावांच्या गाथेचे निरुपण" हा ग्रंथ खरेदीसाठी गर्दी होती.

लोकमत

# दयानंद विद्यापीठाकडे 'कुलगुरू चषक'

## पंजाबी विद्यापीठ उपविजेता; लाला लजपतराय युनिव्हर्सिटी तृतीयस्थानी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** चुरशीने झालेल्या सामन्यात रोहटकच्या महर्षी दयानंद विद्यापीठाने पटियाला पंजाबी विद्यापीठावर १९ धावांनी मात करीत अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकविले. हिस्सारच्या लाला लजपतराय युनिव्हर्सिटीने जम्मू युनिव्हर्सिटीला नमवून तृतीय क्रमांक मिळविला.

येथील शिवाजी विद्यापीठातील पॅव्हेलियन क्रीडांगणावर अंतिम सामना झाला. त्यात प्रथम फलंदाजी करताना दयानंद विद्यापीठाने २० षटकांत सहा बाद १४१ धावा केल्या. त्यांच्यातील गौरव यांनी ४९, नरेंद्र कुमार यांनी ४२ धावांची खेळी केली. गोलंदाजी करताना पंजाबी विद्यापीठाच्या जसबीर सिंग आणि प्रीतपाल सिंग यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. उत्तरादाखल खेळताना पंजाबी विद्यापीठाच्या संघाचा खेळ १९.२ षटकांमध्ये १२२ धावांवर गुंडाळला. सहा चेंडूंमध्ये २० धावांची गरज असताना त्यांचा अखेरचा खेळाडू बाद झाला. दयानंद विद्यापीठाकडून गोलंदाजी करताना दीपक कुमार यांनी तीन, तर पंकज आणि ऋषी यांनी प्रत्येकी दोन बळी घेत संघाच्या



कोल्हापुरात शुक्रवारी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेतील अंतिम सामना झाला. त्यातील विजेत्या रोहटकच्या महर्षी दयानंद विद्यापीठाच्या संघाला शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते चषक प्रदान करण्यात आला. यावेळी शेजारी राम तुपे, बाबा सावंत, पी. टी. गायकवाड, आदी उपस्थित होते.

### विजयी संघ

'रोहटक'च्या विजयी संघात नरेंद्र कुमार, गौरव, राजकुमार, दीपक कुमार, राजेश शर्मा, ऋषी, पंकज, समीर दाहिया, महिपाल, विवेक कुमार, रामबर, राजेश कुमार, योगेंद्र कुमार, प्रवीणकुमार यांचा समावेश आहे.

### वैयक्तिक विजेते

या स्पर्धेत दीपक कुमार (उत्कृष्ट गोलंदाज, ), नरेंद्र कुमार (उत्कृष्ट फलंदाज, रोहटक), शमी भगत (उत्कृष्ट यष्टिरक्षक, जम्मू युनिव्हर्सिटी), प्रीतपाल सिंग (मालिकावीर, पंजाबी विद्यापीठ) हे वैयक्तिक विजेते ठरले.

बाद करणाऱ्या दीपक कुमार (रोहटक) यांनी 'सामनावीर'चा किताब

अॅथलेटिक मैदानावर झालेल्या सामन्यात लाला लजपतराय

गडी राखून विजय मिळविला. या सामन्यात प्रवीण सांगवान 'सामनावीर' ठरले. या विजयी संघांना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते चषक देऊन गौरविण्यात आले. यावेळी विद्यापीठ सेवक संघाचे अध्यक्ष बाबा सावंत, अधिसभा सदस्य राम तुपे, उपकुलसचिव संजय कुबल, जी. एस. राठोड, आदी उपस्थित होते. स्पर्धा सचिव डॉ. पी. टी. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. सुभाष पवार

# कुलगुरु चषक रोहतक विद्यापीठाकडे

## अंतिम सामन्यात पंजाबी विद्यापीठ, पतियाळा १९ धावांनी पराभूत : अखेरच्या षटकापर्यंत चुरस : हिस्सार संघाला तिसरे स्थान






कोल्हापूर : अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचारी 'कुलगरू चषक टी २०'' क्रिकेट स्पर्धेतील विजेत्या एमडीयू रोहतक संघातील खेळाडू चषकासमवेत. सोबत प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक आदी उपस्थित. २) दुसऱ्या छायाचित्रात उपविजेत्या पंजाबी विद्यापीठ पतियाळा संघातील खेळाडू चषकासमवेत. सोबत प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक आदी उपस्थित. (छाया – रियाज ट्रेनर)

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचारी 'कुलगुरू चषक टी २०'' क्रिकेट स्पर्धेत शुक्रवारी अंतिम सामना अपेक्षेप्रमाणे अखेरच्या षटकापर्यंत चुरशीचा झाला. या सामन्यात एमडीयू रोहतक संघाने पंजाबी विद्यापीठ पतियाळा संघावर १९ धावांनी मात करून अजिंक्यपद पटकविले. तर तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या सामन्यात हिस्सार (हरियाणा) विद्यापीठ संघाने जम्मू संघावर ४ विकेटने विजय संपादन केला.

स्पर्धेतील विजेत्या संघांना शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर व स्पर्धा सचिव डॉ.पी.टी.गायकवाड यांच्या हस्ते व बाबा सावंत, राम तुपे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

### स्पर्धेत एकुण ४८ सामन्यांचा थरार

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी २० क्रिकेट स्पर्धेतर्गत एकुण ४८ सामने खेळविण्यात आले. दहा दिवस सुरू असलेल्या साखळी व बाद पध्दतीने खेळविण्यात आलेल्या सामन्यांमध्ये देशातील २० विद्यापीठांच्या सुमारे ४५० कर्मचारी खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर यांच्यासह शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघातील खेळाडूंनी परिश्रम घेतले. तसेच कोल्हापूर जिल्हा क्रिकेट पंच असोसिएशनचे पदाधिकारी व सभासद यांचे सहकार्य लाभले.

**रोहतकचा पतियाळावर १९ धावांनी विजय**

शुक्रवारी दुपारी झालेल्या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना एमडीयू रोहतक संघाने २० षटकात ६ बाद १४१ धावा केल्या. यामध्ये गौरवने ४९ तर नरेंद्रकुमारने ४२ धावांची खेळी करून धावसंख्या उभारण्यात मोलाचे योगदान दिले. पंजाबी विद्यापीठ पतियाळाकडून गोलंदाजी करताना प्रितपालसिंग व जसबिरसिंग यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. उत्तरादाखल खेळताना पंजाबी विद्यापीठ पतियाळाचा डाव १९.३ षटकात सर्वबाद १२२ धावात गुंडाळला. यामध्ये जसबिरसिंगने २९ तर दिपकसिंहने २४ धावांची खेळी करून दिलेली झुंज व्यर्थ ठरली. हा सामना अखेरच्या षटकापर्यंत रंगतदार झाला. गोलंदाजी करताना रोहतककडून दिपकुमार ३ तर पंकज नयन व ऋषी यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. रोहतक पातियाळाने पंजाबी विद्यापीठावर १९ धावांनी मात करून अजिंक्यपद पटकविले.

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी QR Code स्कॅन करा.

**हिस्सारची जम्मूवर ४ विकेटने मात**

सकाळच्या सत्रात झालेल्या तिसऱ्या क्रमांकासाठीच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना जम्मू विद्यापीठाने २० षटकात ८ बाद १८० धावा केल्या. यामध्ये दिपकक्कुमारने ७० तर विशाल सदन ३२ व निरंजनसिंगने २२ धावा करून संघाची धावसंख्या उभारण्यात मोलाचे योगदान दिले. हिस्सार (हरियाणा) कडून गोलंदाजी करताना राहेशकुमार ३ तर प्रविण सांगवान व संदीप दहीया यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. उत्तरादाखल खेळताना हिस्सार (हरियाणा) विद्यापीठाच्या संघाने हे लक्ष अवघ्या १७.३ षटकात गाठण्यात यश मिळविले. त्यांनी ६ बाद १८४ धावा करून सामन्यात विजय संपादन केला. यामध्ये प्रविण सांगवानने ६७ तर अनिलकुमारने ५२ धावांची खेळी करून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. जम्मूकडून गोलंदाजी करताना सुनिल शर्माने ३ बळी घेतले.

### कोल्हापूरकरांच्या प्रेमाने भारावून गेलो

कुलगुरू चषक टी २० क्रिकेट स्पर्धेचे नियोजन अत्यंत चांगले करण्यात आले होते. स्पर्धेत यश मिळविल्यानंतर आनंद झाला असून शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावरील खेळ आठवणीत राहिल. शिवाजी विद्यापीठाच्या कर्मचारी संघाने केलेले स्पर्धेचे उत्कृष्ठ व्यवस्थापन-नियोजन, शिस्तबध्दता, प्रेम, पाहुणचाराने भारावून गेलो आहे. अशा उत्स्फूर्त भावना स्पर्धेत विजेता ठरलेला एमडीयू रोहतक संघाचा कर्णधार राजकुमार यांनी व्यक्त केल्या.

**स्पर्धेतील उत्कृष्ठ खेळाडू :** अंतिम सामन्यातील सामनावीर – दिपकक्कुमार, गोलंदाज – दिपकक्कुमार, फलंदाज – नरेंद्रकुमार, यष्टीरक्षक – शमी भगत, मालिकावीर – प्रितपालसिंग.

# रोहतक संघाकडे कुलगुरू चषक

## आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात खेळवण्यात आलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत महर्षी दयानंद विद्यापीठ रोहतकने विजेतपद पटकावले. शुक्रवारी दुपारी झालेल्या सामन्यात पंजाब विद्यापीठ, पटियाला संघाचा पराभव केला.

अंतिम सामन्यात नाणेफेक जिंकून महर्षी दयानंद विद्यापीठ रोहतकच्या संघाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. रोहतक संघाने २० षटकांत ६ बाद १४१ धावा केल्या. यामध्ये गौरवने ४८ चेंडूंत ४९, तर नरेंद्र कुमारने ४२ चेंडूंत ४२ धावा केल्या. पटियाला संघाकडून जसबीर सिंग आणि प्रीतपाल सिंग यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.



कोल्हापूर : आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेतील विजेता रोहतक विद्यापीठाचा संघ.

प्रत्युत्तरादाखल खेळताना पंजाब युनिर्व्हसिटी पटियाला संघ १९.२ षटकांत सर्व बाद १२२ धावाच करू शकला. जसबीर सिंगने १६ चेंडूंत २९, तर दीपक सिंग याने २४ चेंडूंत २४ धावा केल्या. रोहतक संघाकडून गोलंदाजी करताना दीपक कुमारने ३, पंकज नैन आणि ऋषिक यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. रोहतक संघाच्या दीपक कुमार याला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.

तृतीय स्थानासाठी झालेल्या सामन्यात लाला लजपतराय विद्यापीठ, हिस्सार संघाने जम्मू विद्यापीठ, जम्मू संघावर ४ गडी राखून विजय मिळवला. या सामन्यामध्ये जम्मू विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ८ गड्यांच्या मोबदल्यात १८० धावा केल्या. यामध्ये दीपक कुमार ७०, विशाल सुदान ३८, निरंजन सिंगने २२ धावा केल्या. हिस्सार विद्यापीठाकडून राकेशने ३, प्रवीण आणि संदीप दहिया यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. लाला लजपतराय विद्यापीठ, हिस्सार संघाने हे आव्हान १७.३ षटकांत ६ गड्यांच्या मोबदल्यात पूर्ण केले. यामध्ये हिस्सार संघाने १८४ धावा केल्या. हिस्सारकडून प्रवीण संगवान याने ३५ चेंडूंत ६७ धावा, तर अनिल कुमार याने तडाखेबाज फलंदाजी करत १६ चेंडूंत ५२ धावा केल्या. जम्मूकडून सुमित शर्मा याने ३ बळी घेतले. सामनावीर म्हणून प्रवीण संगवान याला गौरविण्यात आले.

लोकमत

## जानेवारीमध्ये येणार समिती : विद्यापीठ सोमवारी 'नॅक'ला पाठविणार 'आयआयक्यूए'

# मूल्यांकनाची तयारी सुरु

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषदेच्यावतीने (नॅक) करण्यात येणाऱ्या मूल्यांकनाची शिवाजी विद्यापीठाकडून वेगाने तयारी सुरु आहे. मूल्यांकन समितीला इन्स्टिट्यूशन इन्फॉर्मेशन फॉर क्वॉलिटी अ‍ॅश्युरन्स (आयआयक्यूए) अहवाल सोमवारी (दि. २ डिसेंबर) पाठविणार आहे. त्याला मान्यता मिळाल्यानंतर या प्रक्रियेला गती मिळणार आहे.



नॅक मूल्यांकनाच्या नव्या स्वरुपानुसार विद्यापीठाकडून तयारी करण्यात येत आहे. आवश्यक माहिती, अहवाल तयार करण्याचे काम पूर्णत्वास आले आहे. 'आयआयक्यूए' अहवाल सादर करणे हा मूल्यांकन प्रक्रियेतील पहिला टप्पा आहे. मूल्यांकनाच्या अनुषंगाने अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, आदी विद्यापीठांच्या घटकांच्या बैठका घेण्यात येणार आहेत.

-डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु

विद्यापीठाचे ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१४ मध्ये नॅक मूल्यांकन झाले होते. त्यानंतर आता पाच वर्षांनी मूल्यांकन होणार आहे; त्यासाठी मूल्यांकनाच्या बदललेल्या स्वरुपानुसार विद्यापीठाची तयारी सुरु आहे. विविध अधिविभाग आणि प्रशासकीय विभाग, विद्यार्थी, महाविद्यालय, अभ्यासक्रम, संशोधनविषयक माहिती विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाकडून संकलित केली आहे. मूल्यांकनाचे पहिले पाऊल म्हणून विद्यापीठ सोमवारी 'आयआयक्यूए' अहवाल बंगलोरच्या 'नॅक'च्या पोर्टलवर जमा करणार आहे. त्यानंतर ४५ दिवसांमध्ये सेल्फ स्टडी रिपोर्ट नॅकला सादर करण्यात येईल. या अहवालानुसार विद्यार्थी समाधान सर्वेक्षण, सादर माहितीची पडताळणी करुन काही सूचना 'नॅक'कडून करण्यात येतील. त्याची पूर्तता केल्यानंतर जानेवारी अखेरीस अथवा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात नॅक समिती मूल्यांकनासाठी विद्यापीठ येणार आहे, असे डॉ. आर. के. कामत यांनी सांगितले.

Kolhapur Main
Page No. 4 Nov 30, 2019
Powered by: erelego.com



**कोल्हापूर : दिव्यांगांसंदर्भातील राष्ट्रीय चर्चासत्राचे दीपप्रज्वलन करून उद्‌घाटन करताना डॉ. राजेंद्र हिरेमठ. सोबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, डॉ. प्रतिभा देसाई आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

# दिव्यांग विद्यार्थ्यांनी देश, समाजाच्या विकासात हातभार लावावा : डॉ. हिरेमठ

## शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दिव्यांग विद्यार्थ्यांनी चांगले नागरिक म्हणून देशाच्या व समाजाच्या विकासामध्ये हातभार लागेल अशा प्रकारे जीवनमान उंचावण्यासाठी कटिबद्ध व्हावे, असे प्रतिपादन डॉ. राजेंद्र हिरेमठ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या यूजीसी स्किम्स फॉर परसन्स वीथ डिसअॅबीलिटीज या विभागामार्फत 'उच्च शिक्षण आणि सर्वसमावेशक पद्धतींमध्ये दिव्यांगांची प्रवेश योग्यता' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते. कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर अध्यक्षस्थानी होते. यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. हिरेमठ म्हणाले, उच्च शिक्षणामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे प्रमाण अल्प आहे. ते वाढविण्यासाठी शिक्षणाबरोबरच आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. समाजाने दिव्यांगांप्रती सहानुभूती दर्शविण्यापेक्षा त्यांचे समर्थन करावे, त्यांना साथ द्यावी. दिव्यांगांनी आपल्यातील कमतरताना न कुरवाळता त्यावर मात करून पुढे येणाऱ्या आव्हानांना सामोरे गेले पाहिजे. युजीसी स्किम्स फॉर परसन्स वीथ डिसअॅबीलिटीज विभागाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन लिटॉन प्रसाद यांनी केले. वनस्पतीशास्त्र विभागाच्या डॉ.कल्याणी पवार यांनी आभार मानले.